वाशी पोलीस ठाणे गु.र.क्र ६७/१३ (बिल्डर सुनिलकुमार लाहोरिया खुन प्रकरण) च्या गुन्ह्याप्रकरणी मा.सत्र न्यायालय,ठाणे येथे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड श्री.विलास के. नाईक यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी २०१५/प्र.क्र.३५/पोल-१०
२ रा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजुगुरु चौक
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० मार्च, २०१९

संदर्भ:- शासन अधिसुचना, विधी व न्याय विभाग क्र.एसपीपी ३८१५/ए.एस.२७/डी-१४, दिनांक २६.०२.२०१९.

शासन निर्णय:-

वाशी पोलीस ठाणे गु.र.क्र ६७/१३ गुन्ह्याप्रकरणी मा.सत्र न्यायालय,ठाणे येथे शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड श्री.विलास के. नाईक यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन २६.०२.२०१९ च्या अधिसूचनेद्वारे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड श्री.विलास के. नाईक यांना खालीलप्रमाणे फी अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रतीदिन परिणामकारक सुनावणी फी रु.२०,०००/-
ब) प्रवासखर्च- ठाणे सत्र न्यायालयात जाण्यायेण्यासाठी

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड श्री.विलास के. नाईक यांना उपरोक्त फी व्यतिरिक्त अपरिणामकारक सुनावणी फी किंवा अन्य कोणत्याही प्रकारची फी वा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

३. यासाठी येणारा खर्च यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना - (२०५५ ००९७) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशिर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८१/१९/व्यय-७, दिनांक ११.०३.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१३१७०६२७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.03.20 13:27:19 +05'30'

(किशोर शा.भालेराव)
उप सचिव (विधी),गृह विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

आपणांस विनंती करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड श्री.विलास के. नाईक यांना अंतिमत: अदा करण्यात आलेल्या फी च्या एकूण रक्कमेची सविस्तर तपशिलवार माहिती शासनास उपलब्ध करुन द्यावी.

२. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
३. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई.
४. पोलीस आयुक्त, ठाणे.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा)-१/२,महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे.
८. विधि व न्याय विभाग,कार्या-१४,मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
१०. ॲड श्री.विलास के. नाईक, 'मनिषा',श्रीबाग नं.३,एचडीएफसी बँक समोर, अलीबाग, जि-रायगड-४०२२०१.
११. निवडनस्ती पोल १०.